<u>वादीतर्फे साक्षीदार क्र.२ चा उलटतपास प्रतिवादी क्र.१ ते ३ तर्फे ॲड. श्री.पी.एम. राठी वकिलांमार्फत शपथेवर पुन्हा सुरू.</u>

१. हे म्हणणे खरे आहे की, मी कृषी उत्पन्न बाजार समिती, खामगांव येथे लिपीक पदावर कार्यरत आहे, हे दर्शविण्यासाठी कोणताही दस्त अभिलेखावर दाखल केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, कृषी उत्पन्न बाजार समिती, खामगांव यांच्या सचिवांनी मला प्रस्तुत प्रकरणात पुरावा देण्यासाठी पाचारण केल्याबाबतचा दस्त मी अभिलेखावर दाखल केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, सचिवांनी मला पुरावा देण्याचा कोणताही अधिकार दिला नसल्याने माझा पुरावा ग्राह्य धरता येणार नाही.

२. हे म्हणणे खरे आहे की, कृषी उत्पन्न बाजार समितीत येणारा उडीदाचा माल हा त्याच्या गुणवत्तेवरून निश्चित केला जातो. हे म्हणणे खरे आहे की, उडीदाचा माल हा तीन ते पाच वर्षे जुना असल्याने त्याची किंमत कमी स्वरूपात असते. हे म्हणणे खरे आहे की, उडीदाच्या मालाची गुणवत्तेवरून खरेदीदार त्याची किंमत ठरवितात. हे म्हणणे खरे आहे की, ज्या दिवशी माल बाजारात आणल्या जातो व त्या दिवशी जरी मालाची किंमत निश्चत असली तरी देखील माल जुना असल्यास त्याची किंमत कमी दिल्या जाते. हे म्हणणे खरे आहे की, कृषी उत्पन्न बाजार समितीचे खरेदीदार हे मालाच्या गुणवत्तेवर मालाची किंमत ठरवुन विकत घेतात व ती किंमत योग्य असते.

३. हे म्हणणे खरे आहे की, वादी हे व्यापारी असल्याने माझ्या परीचयाचे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी वादीच्या सांगण्यावरून प्रस्तुत प्रकरणात पुराव्याकामी न्यायालयात हजर झालो. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासात उडीदाची किंमत जास्ती किंवा कमी ही मी चुकीची सांगितली. हे म्हणणे खरे नाही की, केवळ वादीला मदत करण्यासाठी मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला.

फेरतपास काही नाही.

समक्ष

**Sd/-**

दिनांक: ०६.०५.२०२६ (व्ही. व्ही. जोशी)

ठिकाण: अकोला न्यायाधीश

सहकार न्यायालय, अकोला.